# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

1969 to 2029 REACHING NATIONS ECHO OF HIS CALL SINCE 1969

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVIII    YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2026 JULY    No. 06


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

स्तोत्र ३:१-८

१. हे यहोवा, माझे शत्रू कसे वाढले आहेत! माझ्यावर उठणारे पुष्कळच आहेत.

२. देवाच्या ठायी त्याला काही तारण नाही, असे माझ्या जीवाविषयी बोलणारे पुष्कळच आहेत.

३. तरी हे यहोवा, तू माझ्यासभोवती ढाल आहेस, तू माझे वैभव, आणि माझे डोके वर करणारा आहेस.

४. मी आपल्या वाणीने यहोवाला हाक मारतो, आणि तो आपल्या पवित्र डोंगरातून मला उत्तर देतो.

५. मी अंग टाकून झोपी गेलो, मी जागा झालो, कारण यहोवा मला सांभाळतो.

६. सभोवती जे लाखो लोक माझ्याविरुद्ध उभे आहेत त्यांना मी भिणार नाही.

७. हे यहोवा, ऊठ; माझ्या देवा, मला तार, कारण तू माझ्या सर्व वैऱ्यांच्या थोबाडांत मारले आहे; तू दुष्टांचे दात मोडून टाकले आहेत.

८. तारण यहोवापाशीच आहे, तुझ्या लोकांवर तुझा आशीर्वाद असो.

# आपला प्रभू तुम्हाला जे दिसते त्याच्या पलीकडे जाऊन कार्य करू शकतो

**Our Lord Jesus Christ Can Work Beyond What You Can See!**

*- सिस्टर अँजेलिन*




आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त यांच्या अमूल्य नावात, **एको ऑफ हिज कॉल** च्या सर्व विस्तारित सदस्यांना हार्दिक शुभेच्छा. देवाने आपल्या कृपेने आम्हाला २०२६ वर्षाच्या उत्तरार्धात सुरक्षितपणे आणि विश्वासूपणे आणले आहे. त्याची शांती, दिलासा, विपुल कृपादृष्टी आणि अनुग्रह तुमच्या प्रत्येकावर सदैव राहो, अशी मी प्रार्थना करते.

पवित्र शास्त्रातील माझ्या सर्वात आवडत्या वचनांपैकी एक म्हणजे इफिसकरांस ३:२०: **"तर आता आम्ही ज्याची मागणी किंवा कल्पना करतो त्यापेक्षा जो आम्हांमध्ये कार्य करणाऱ्या सामर्थ्याच्या प्रमाणाने फार अधिक करण्यास समर्थ आहे."**

आपला प्रभू येशू ख्रिस्त इतका सामर्थ्यशाली आहे की तो आपल्या सर्व अपेक्षांच्या पलीकडे कार्य करतो. आपण जे पाहू शकत नाही किंवा ज्याची कल्पनाही करू शकत नाही, तेही तो पूर्ण करण्यास समर्थ आहे. तो आपल्या प्रतिकूल असलेल्या परिस्थितींना आपल्यासाठी अनुकूल करून त्याचे आशीर्वादात रूपांतर करू शकतो.

(...पान २ वर)


## एको आफ हिज कॉल



### ख्रिस्ती यूट्यूब चॅनल!

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्यातर्फे

प्रतिदिन २ मिनिटांचा संदेश!

इंग्रजी आणि हिंदी भाषेत - प्रात: १ वाजता

तमिळ आणि तेलुगू भाषेत - प्रात: २ वाजता

आणि

तमिळ आणि इंग्रजीत संदेश आणि प्रार्थना

रविवारी सकाळी ८:३० आणि संध्याकाळी ६ वाजता

जर तुम्हाला आशीर्वाद मिळाला असेल, तर कृपया सदस्यता घ्या! ज्यांच्यावर तुम्ही प्रेम करता व काळजी करता त्यांच्यासोबत हे शेअर करा!!

ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)
Estd. 1969



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**''तू माझ्यासाठी माझा विलाप बदलून नाचणे केले आहे;.........''**
**– स्तोत्र ३०:११.**



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.
EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

प्रभूमध्ये प्रियजनहो,

आपला प्रभू आणि तारणहार येशू ख्रिस्त याच्या पवित्र नावाने तुम्हाला अभिवादन!

**प्रभु येशू ख्रिस्ताने स्वत: भाकीत केले होते की लढाया, लढायांच्या आवया, संघर्ष, दुष्काळ, महामारी, भूकंप, विश्वासणाऱ्यांवरील छळ, खून, हेवा, खोटे संदेष्टे आणि वाढता अधर्म ही शेवटच्या काळाची लक्षणे असतील** (मत्तय २४:३-१२). आजच्या जगात या घटना घडताना पाहून, आपण ज्या काळात जगत आहोत त्याच्या तातडीची जाणीव आपल्याला पुन्हा होते.

म्हणून, जोपर्यंत आपल्याला संधी आहे, तोपर्यंत आपण पवित्र शास्त्राच्या या उपदेशाचे विश्वासूपणे पालन करूया:

*''वचन गाजीव, सुकाळी अकाळी त्यात तत्पर ऐस, सर्व सहनशीलतेने व शिक्षणाने दोष पदरी घाल, निषेध कर व बोध कर.''* – २ तीमथ्य ४:२.

आपण या दैवी जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे.

देवाच्या कृपेने, आम्ही आमच्या सर्व सेवाकार्यांमध्ये त्याच्या विपुल आशीर्वादांचा सतत अनुभव घेत आहोत. अनेकांना आश्चर्य वाटते की इतकी सेवाकार्ये एकाच वेळी कशी काय पार पाडली जाऊ शकतात. तरीसुद्धा, देवाने दिलेल्या सामर्थ्याने आणि कृपेने आम्ही आमच्यावर सोपविण्यात आलेले प्रत्येक सेवाकार्य कोणतीही जबाबदारी दुर्लक्षित न करता पूर्ण करू शकत आहोत. सर्व गौरव केवळ त्यालाच असो!

देवाच्या कृपेने, चेपॉक आणि संतोषपुरम येथील **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूल** व **नेहेम्या बायबल कॉलेजेसमधील** तमिळ माध्यमाचे वर्ग १ जून रोजी आणि हिंदी माध्यमाचे वर्ग ६ जुलै रोजी पुन्हा सुरु होत असल्याची माहिती देताना आम्हाला आनंद होत आहे. याशिवाय, **नेहेम्या बायबल कॉलेजेसचा** पदवीदान समारंभ ४ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

अनेकदा प्रचंड जबाबदाऱ्या आणि कामाच्या मोठ्या ओझ्याखाली असतानाही, देव आम्हाला आमची कर्तव्ये यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सतत सामर्थ्य देत राहतो.

ही सेवाकार्ये प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी आम्हाला दूरदृष्टी असलेल्या, विश्वासू आणि समर्पित कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. इंग्रजी व हिंदी भाषांमध्ये प्रवीण असलेले सहाय्यक मुख्याध्यापक, शिक्षक, व्यवस्थापक, सचिव, कार्यालयीन कर्मचारी, मुद्रण विभागातील कर्मचारी, कार्यालयीन सहाय्यक, स्वच्छता कर्मचारी, महिला स्वयंपाकी, सुरक्षा कर्मचारी, वाहनचालक आणि सेवाकार्यासाठी विशेष पाचारण असलेले पाळक यांच्याकडून आम्ही अर्जांचे स्वागत करतो आणि त्यांच्या संदर्भात प्रार्थनेची विनंती करतो.

प्रभू ज्यांना आमच्याकडे पाठवील, अशा प्रत्येक प्रामाणिक व पात्र व्यक्तीची नियुक्ती करून त्यांना आवश्यक ते सहकार्य देण्यास आम्ही तयार आहोत. देव आपल्या कार्यासाठी योग्य लोकांना उभे करील, यासाठी कृपया प्रार्थना करा.

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ◘ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ◘ YouTube Ministry ◘ Online Courses ◘ Theological Correspondence Courses (2 languages) ◘ Church Planting ◘ Nehemiah Bible Colleges ◘ Gospel Printing Press ◘ Great Commission Partners ◘ St. Paul's Matriculation School ◘ Crusades ◘ Community Development

*''...........पीक खरोखर फार आहे, परंतु कामकरी थोडे आहेत. म्हणून तुम्ही पिकाच्या प्रभूची प्रार्थना करा की त्याने आपल्या पिकात कापणी करायला कामकरी पाठवून द्यावे.''*- मत्तय ९:३७-३८.

१६ मे २०२६ रोजी **नेहेम्या बायबल कॉलेजेसची** प्राध्यापक बैठक संपन्न झाली. या बैठकीत पदवीदान समारंभाच्या तयारीविषयी आणि २०२६-२०२७ या आगामी शैक्षणिक वर्षाच्या नियोजनासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली.



*नहेम्या बायबल कॉलेज मधून ०४-०७-२०२६ रोजी पदवी प्राप्त करणारे काही विद्यार्थी.*

प्रभूची विश्वासूपणे, तत्परतेने आणि देवाच्या भयात राहून सेवा करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या सेवाकार्यात आपल्या सातत्यपूर्ण प्रार्थना व सहकार्याची आम्ही नम्रपणे विनंती करतो.

तुमच्यासाठी आणि तुमच्या कुटुंबियांसाठी आम्ही प्रार्थना करीत आहोत, याची खात्री बाळगा. त्याच्या गौरवशाली समृद्धीनुसार देव तुमच्या सर्व गरजा पूर्ण करो, हीच आमची प्रार्थना आहे.

प्रभूची कृपा तुम्हा सर्वांबरोबर असो.

आमेन!

येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**

E.mail: sam@echoofhiscall.org

(पान १ वरून...)

गेल्या काही महिन्यांत तुम्ही कोणत्या परिस्थितीतून गेलात हे मला कदाचित माहीत नसेल; परंतु मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की प्रभु येशू ख्रिस्त इतका सामर्थ्यवान आहे की तो सर्व गोष्टी तुमच्या हितासाठी कार्य करण्यास लावू शकतो; अगदी त्या गोष्टीसुद्धा ज्यांमुळे तुमच्या अनेक रात्रींची झोप उडाली आहे.

हाग्गयच्या पुस्तकातील २:६ या वचनात आपण वाचतो: **''कारण सैन्याचा यहोवा असे म्हणतो, आणखी एकदा, थोड्या वेळाने मी आकाशांना आणि पृथ्वीला आणि समुद्राला व कोरड्या भूमीला हालवीन,..........''**



*थोड्याच वेळात मी पुन्हा एकदा आकाश आणि पृथ्वी हलवीन.*

देव आपल्या योजना पूर्ण करण्यासाठी आकाश आणि पृथ्वीही हलवू शकतो. याची कल्पना करा! संपूर्ण विश्वाचा निर्माणकर्ता तुमच्या आणि माझ्या भल्यासाठी सर्व परिस्थिती आपल्या नियंत्रणात आणून कार्य करू शकतो!

प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, सैतान अनेकदा आपल्या जीवनातील देवाच्या बोलावणीची (उद्देशाची) पूर्तता करण्यापासून आपले लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करतो. तो आपले ध्येय आणि लक्ष ढळवतो व महत्त्व नसलेल्या गोष्टींकडे आपले मन वळवतो. हे तो कसे करतो? आपल्या जीवनात अंतर्गत आणि बाह्य अशा विविध समस्यांना व अडचणींना जन्म देऊन.

जेव्हा देव आपल्याला बाह्य लढाया व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बोलावतो, तेव्हा आपले लक्ष मुख्य कार्यावरून हटावे म्हणून शत्रू आपल्या कुटुंबात आणि मंडळीमध्ये अंतर्गत समस्या, मतभेद व गोंधळ निर्माण करतो. बाहेर पेटलेल्या आगी विझवण्याऐवजी, आपण आपल्या स्वतःच्या घरात लागलेल्या आगी विझवण्यातच व्यस्त होऊन जातो. तो अशी फसवणूक करतो की आपण आपल्या कुटुंबातील लोकांनाच किंवा

## अत्यंत महत्त्वाची सुचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**




*जेव्हा देव आपल्याला बाह्य आव्हानांना सामोरे जाण्यास बोलावतो, तेव्हा शत्रू अंतर्गत अस्थिरता निर्माण करतो.*

विश्वासातील बंधू-भगिनींनाच शत्रू समजू लागतो; परंतु खरा शत्रू तर बाहेर फिरणाऱ्या गर्जणाऱ्या सिंहासारखा आपल्यावर झडप घालण्याची संधी शोधत असतो.

एज्रा आणि हाग्गय यांच्या पुस्तकांतून आपण पाहतो की, सत्तर वर्षांच्या बंदिवासातून परत आल्यानंतर इस्राएल लोकांना देवाची इच्छा पूर्ण करण्यासाठी बाहेरील विरोधाबरोबरच अंतर्गत अडचणी आणि संघर्षांनाही तोंड द्यावे लागले. या सर्व संघर्षांमधून त्यांनी देवाला त्यांच्या कल्पनेपलीकडे आणि अपेक्षांहून कितीतरी अधिक सामर्थ्याने कार्य करताना पाहिले.

***बाह्य आव्हाने (एज्रा अध्याय ५)***

मंदिराच्या पुनर्बांधणीच्या काळात लोकांना बाहेरून तीव्र विरोध आणि प्रचंड दबावाचा सामना करावा लागला:



*मंदिराच्या पुनर्बांधणीच्या काळात लोकांनी प्रचंड बाह्य संघर्षाचा सामना केला.*

- सततच्या तक्रारी आणि विरोध
- त्यांच्या अधिकाराची वैधता तपासण्यासाठी शेजारील सत्ताधिकाऱ्यांनी केलेली चौकशी आणि हस्तक्षेप
- राजकीय स्तरावरील चौकशी – राजा कोरेशाच्या आज्ञापत्राची सत्यता तपासण्यासाठी राजा दारयावेशाने शोध घेण्याचा आदेश दिला.



*राजा दारयावेशने राजा कोरेशच्या आदेशाची चौकशी केली तेव्हा राजकीय तपासणी झाली.*

***अंतर्गत आव्हाने (हाग्गय)***

त्याच वेळी, त्यांना अंतर्गत संघर्षांचाही सामना करावा लागला:

- पूर्वीच्या मंदिराशी सतत तुलना करणे
- परिणामी, ते निराश, भयभीत आणि खचून गेले.

**अशा प्रकारच्या परिस्थितीचा अनुभव तुम्हालाही आला आहे का?**

- जेव्हा आपण देवाजवळ जाण्याचा प्रयत्न करतो.
- जेव्हा आपण देवाला संतोषविणारे जीवन जगण्याचा निर्णय घेतो.
- जेव्हा आपण आपल्या जीवनावरील देवाच्या बोलावणीची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील राहतो.

आपल्यालाही अशाच अंतर्गत आणि बाह्य आव्हानांचा सामना करावा लागत नाही का?

इतका संघर्ष असताना सुद्धा आपल्यापैकी किती जणांनी पुढे वाटचाल सुरू ठेवली आहे? आणि आपल्यापैकी किती जणांनी देवाने दिलेली उद्देश्य व त्याचे बोलावणे सोडून दिले आहे?

आज देव आपल्याला स्मरण करून देत आहे की, आपण अशा सर्वशक्तिमान देवाची सेवा करतो, जो आपल्या जीवनाविषयीची आपली योजना आणि उद्देश पूर्ण करण्यासाठी संपूर्ण जग हलवू शकतो. प्रश्न हा आहे – आपण तयार आहोत का?

## १. अंतर्गतपणे सामोरे जावे लागलेली आव्हाने!

इस्राएल लोकांनी मंदिराचे पुनर्निर्माण सुरू केले तेव्हा त्यांना तुलना करण्याच्या वृत्तीशी संघर्ष करावा लागला. ही अशी गोष्ट आहे, ज्याचा सामना आपण सर्वजण-वय, लिंग किंवा राष्ट्रीयत्व यांची पर्वा न करता-करत असतो, आणि अनेकदा आपल्याला त्याची जाणीवही नसते.

आपण अनेकदा आपल्या जीवनाची इतरांच्या जीवनाशी तुलना करतो – आपले घर, गाडी, नोकरी, उत्पन्न, पती किंवा पत्नी, शिक्षण, मुले, आणि इतकेच नव्हे तर आपली ख्रिस्ती सेवा व देवाने दिलेले बोलावणे यांचीसुद्धा तुलना करतो. असे करताना, देवाने आपल्या दैवी योजनेनुसार



*आपण आपल्या जीवनाची इतरांबरोबर तुलना करतो.*

आपल्यापैकी प्रत्येकाला वेगळ्या आणि अद्वितीय रीतीने घडवले आहे, ही गोष्ट आपण ओळखू शकत नाही.

बाह्य शत्रूंना सामोरे जाण्यापूर्वी, इस्राएल लोकांना प्रथम स्वतःच्या अंतःकरणातील संघर्षाचा सामना करावा लागला. त्यांनी नव्या मंदिराची तुलना पूर्वीच्या मंदिराशी केली. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या कार्याचे आणि देवाने त्यांच्यासाठी आधीच केलेल्या महान कार्याचे महत्त्व कमी लेखले. देवाने त्यांना बंदिवासातून परत आणले होते आणि कोरेश व दारयावेश यांसारख्या परराष्ट्रीय राजांची कृपादृष्टी त्यांच्यावर मिळवून दिली होती; तरीही ते देवाच्या या कृपाकार्यांकडे दुर्लक्ष करून नव्या मंदिराची तुलना जुन्या मंदिराशी करत राहिले. यामुळे ते देवाची अद्भुत कृत्ये विसरले. जेव्हा आपण तुलना करतो, तेव्हा आपण कृतघ्न बनतो. यामुळे निरुत्साह, निराशा आणि भावनिक क्लेश निर्माण होतात.

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ जुलै, २०२६ पासून ते १८ ऑगस्ट, २०२६

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ जुलै -** आमच्या सर्व सहाय्यक संपादकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना देवाने भरपूर आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२० जुलै -** प्रभू आमच्या मुख्य मंडळीमध्ये आणखी अनेक नवीन विश्वासणाऱ्यांना जोडत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

**२१ जुलै -** आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या **नहेम्या बायबल कॉलेज** अभ्यासक्रमांसाठी नवीन विद्यार्थ्यांना आम्हांस देवाने जोडण्यास मदत केली यासाठी देवाची स्तुती करा.

**२२ जुलै -** आमच्या **ग्लोबल व्हिजन फॉर द युथ अँड कीड केअर मिनिस्ट्रीला** देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२३ जुलै -** सुवार्ता ज्या भागांमध्ये पोहोचली नाही तिथे पोहोचविण्यास देवाने आम्हांस कृपा पुरवली यासाठी देवाची स्तुती करा.

**२४ जुलै -** आमच्या मिशन कार्यकर्त्यांची महान समर्पणभावना आणि कार्यनिष्ठा यासाठी देवाची स्तुती करा.

**२५ जुलै -** १९६९ पासून आमच्या मासिक सेवाकार्याला प्रभूने भरपूर आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२६ जुलै -** बालाजी नगर, संतोषपुरम आणि वेलाचेरी येथे आमच्या रविवारच्या उपासनेला नवीन विश्वासणाऱ्यांच्या उपस्थितीसाठी देवाची स्तुती करा.

**२७ जुलै -** विशेषतः ज्यांनी आतापर्यंत देवाचे वचन ऐकले नाही अशा लोकांपर्यंत ५-मिनिटांचे युट्युब संदेश लोकांपर्यंत पोहचवून आमच्या या सेवाकार्याला देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२८ जुलै -** कुशल कामगारांच्या साहाय्याने देवाने आमच्या सुवार्ता मुद्रण प्रेसचे कार्य सतत चालू ठेवले आहे यासाठी देवाची स्तुती करा.

**२९ जुलै -** **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेजेस** आणि **थिऑलॉजिकल कॉरिस्पॉन्डन्स कोर्स** या सर्व कार्याला देव आशीर्वादित करीत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

**३० जुलै -** आमच्या राज्य समन्वयकांना आणि त्यांच्या सहभागितेला देव आशीर्वादित करतो यासाठी देवाची स्तुती करा.

**३१ जुलै -** आपल्या राष्ट्राला तो सुरक्षित ठेवतो यासाठी देवाची स्तुती करा.

**०१ ऑगस्ट -** पास्टर एस सॅम सेल्वराज यव त्यांच्या कुटुंबियांना देव आशीर्वादित करतो यासाठी देवाची स्तुती करा.

**०२ ऑगस्ट -** प्रार्थना व निष्ठावान सहकार्याद्वारे आम्हाला पाठिंबा देणाऱ्या सर्व समर्थकांवर प्रभूचे विपुल आशीर्वाद लाभले यासाठी देवाची स्तुती करा.

**०३ ऑगस्ट -** आमच्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांना देव विपुलतेने आशीर्वादित करतो यासाठी देवाची स्तुती करा.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ ऑगस्ट -** अद्याप न पोहोचलेल्या भागांमध्ये सुवार्ता पोहोचविण्यास देवाने आम्हाला सक्षम करावे कृपया यासाठी प्रार्थना करा.

**०५ ऑगस्ट -** सर्व धर्मांच्या लोकांमध्ये एकता आणि सौहार्द राहावे कृपया यासाठी प्रार्थना करा.

**०६ ऑगस्ट -** देवा समोर सर्व राष्ट्रांच्यामध्ये नीतिमत्ता असावी कृपया यासाठी प्रार्थना करा.

**०७ ऑगस्ट -** संपूर्ण जगात शांतता नांदावी कृपया यासाठी प्रार्थना करा.

**०८ ऑगस्ट -** सर्व ख्रिस्ती संस्था आणि सेवाकार्यांसाठी कृपया प्रार्थना करा.

**०९ ऑगस्ट -** सेवाकार्याच्या ५८व्या वर्षात पदार्पण करीत असताना देवाचे विपुल आशीर्वाद लाभोत यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१० ऑगस्ट -** आमचे वरिष्ठ पास्टर एस सॅम सेल्वा राज यांच्या भावी योजनांना देवाचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद लाभावेत कृपया यासाठी प्रार्थना करा.

**११ ऑगस्ट -** आमच्या मिशन क्षेत्रांमध्ये सेवा करणाऱ्या सेवाकर्मींसाठी कृपया प्रार्थना करा.

**१२ ऑगस्ट -** आमच्या वरिष्ठ पास्टरांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यात यश लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१३ ऑगस्ट -** रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाचा अंत व्हावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१४ ऑगस्ट -** संपूर्ण जगात कायमस्वरूपी शांतता नांदावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१५ ऑगस्ट -** आमच्या समन्वयकांना आणि पास्टरांना नवीन बळ आणि प्रोत्साहन लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१६ ऑगस्ट -** कुटुंबांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या सैतानाच्या सर्व दुष्ट कार्यांचा नाश व्हावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१७ ऑगस्ट -** **व्हेकेशन बायबल स्कूल** मध्ये येशू ख्रिस्ताच्या प्रेमाचा अनुभव घेतलेल्या शेकडो मुलांनी प्रभूमध्ये स्थिर राहून विश्वासाने पुढे चालावे आणि नियमितपणे चर्चला उपस्थित राहावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१८ ऑगस्ट -** आमचे वरिष्ठ पास्टर एस सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे प्रत्येक दुष्ट शक्तीपासून देवाचे संरक्षण लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

**"ज्याने हे घर त्याच्या पहिल्या वैभवात असलेले पाहिले असा कोण तुम्हांमध्ये उरला आहे? आणि आता तुम्हांला हे कसे दिसते?........."**(हाग्गय २:३).



*ज्याने हे घर त्याच्या पहिल्या वैभवात असलेले पाहिले असा कोण तुम्हांमध्ये उरला आहे?*

- नवीन मंदिर आकाराने लहान दिसत होते.
- संसाधनांची कमतरता होती
- शलमोनाच्या मंदिराच्या भव्यतेमुळे त्यांचे वर्तमान कार्य झाकोळून गेले
- जे मंदिर एके काळी भग्नावस्थेत होते, त्याची लोक पुनर्बांधणी करीत आहेत.

***पवित्र शास्त्र सांगते की त्यांनी दोन आवाज ऐकले:***

१. पहिले मंदिर पाहिलेल्या लोकांचा आवाज – वर्तमान मंदिराची तुलना त्यांनी वर्षांपूर्वी पाहिलेल्या वैभवाशी करताच त्यांच्या अंतःकरणातून दुःख आणि वेदनेचा आक्रोश उमटला.

२. सध्याच्या पिढीचा आवाज मात्र त्यांच्या उल्लेखनीय कार्यसिद्धीमुळे आनंदाने जयघोष करणारा होता. जरी आनंद व्यक्त करणाऱ्यांची संख्या दुःख व्यक्त करणाऱ्यांपेक्षा अधिक असली, तरीही दुःखाचा आवाज अधिक ठळकपणे आणि प्रभावीपणे घुमत होता.

तरीसुद्धा, निराशेचा आवाजच अधिक ठळकपणे ऐकू येत होता.

तथापि, एज्राच्या पुस्तकाच्या सहाव्या अध्यायातून एक अधिक गहन सत्य उलगडते: पूर्वीच्या मंदिराची महानता शलमोनाच्या वैभवात होती, पण या मंदिराची महानता देवाच्या उद्देशात होती.

- देवाने मूर्तिपूजक राजांच्या माध्यमातून अनपेक्षित रीतीने आवश्यक तरतूद करून दिली.
- हे कार्य देवाच्या अधिकाराखाली पूर्ण करण्यात आले.
- राजाकडून संरक्षण प्रदान करण्यात आले.
- उपासना पुन्हा सुरू करण्यात आली.
- शांती आणि स्थैर्य पुन्हा प्रस्थापित झाले.

**"ह्या घराचे शेवटचे वैभव ह्याच्या पूर्वीच्या वैभवापेक्षा अधिक मोठे होईल, असे सैन्यांचा यहोवा म्हणतो;.........."** – हाग्गय २:९.



*ह्या घराचे शेवटचे वैभव ह्याच्या पूर्वीच्या वैभवापेक्षा अधिक मोठे होईल, असे सैन्यांचा यहोवा म्हणतो.*

***हे सर्वाधिक महान वैभव त्याच्या आकारामुळे किंवा सोन्यामुळे नव्हते. ते खालील गोष्टींमुळे होते:***

- प्रतिकूल परिस्थितीतही देवाची विश्वासार्हता.
- नम्र आणि आज्ञाधारक लोकांमध्ये त्याची उपस्थिती.
- आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, येशू ख्रिस्त स्वतः एक दिवस या मंदिरात येणार होता, ही त्याची खरी महानता होती.

तुलनेमुळे ते देवाच्या कार्याचे मोल ओळखण्यात अपयशी ठरले; तरीही देवाने आपल्या दयाळूपणाने योग्य वेळी त्यांना धीर, आशा आणि प्रोत्साहन देऊन पुन्हा उभे केले.

बलवान व्हा!

***हाग्गय २:४ मध्ये, देव संदेष्ट्याद्वारे बोलतो:***

**"आता हे जरुब्बाबेला, बलवान हो,........ यहोसादाकाच्या मुला यहोशवा, मुख्य याजका, बलवान हो, आणि देशातल्या सर्व लोकांनो, बलवान व्हा व काम करा; कारण मी तुम्हांपाशी आहे......"**

देवाने तीन वेळा बलवान व्हा अशी आज्ञा दिली, आणि त्याद्वारे आपल्या उपस्थितीची त्यांना खात्री दिली – "........ **माझा आत्मा तुम्हांमध्ये राहत आहे; तुम्ही भिऊ नका**" – हाग्गय २:५.

आज देव सांगत आहे: "बलवान व्हा, खंबीर राहा. तुम्ही कोणत्याही परिस्थितीतून जात असाल, तरी मी तुमच्याबरोबर आहे."

(पान ९ वर)

नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नै
प्रवेशा करिता त्वरा करा!
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
हिंदी (अर्धवेळ)
ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभुत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अशिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

*अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -*

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चेन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९१९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## आपल्या मंडळ्यांमध्ये अशा मजबूत खांबांची गरज आहे!

**''जो जिंकतो त्याला मी माझ्या देवाच्या मंदिरातील खांब करीन,..............'' - प्रकटी ३:१२.**



माझ्या तरुणपणी, मी चेन्नई येथील दिवंगत पास्टर जी. सुंदरम यांच्या नेतृत्वाखालील अपोस्टोलिक ख्रिश्चन असेंब्ली चर्चमध्ये दृढपणे स्थिर झालो होतो. ते एक खंबीर आध्यात्मिक नेते होते. आपल्या देवभक्त जीवनाद्वारे, सामर्थ्यशाली संदेशांद्वारे आणि विश्वासूपणे दिलेल्या प्रशिक्षणाद्वारे त्यांनी देवाच्या राज्यासाठी हजारो सेवक घडवले. त्यांची स्मरणशक्ती असामान्य होती. रविवारच्या उपासनेला विश्वासूपणे येणाऱ्या व्यक्तींना तसेच अनुपस्थित राहणाऱ्यांनाही ते सहजपणे ओळखत असत.

त्यांच्या नेतृत्वाखाली सेवा करणाऱ्या अनेक विश्वासू कार्यकर्त्यांमध्ये देवाचे तीन उल्लेखनीय सेवक होते: दिवंगत बंधू टी. सेल्वराज, जे राज्य शासनाचे कर्मचारी होते; दिवंगत बंधू व्हिक्टर स्वामीदास, जे रेल्वे विभागात कार्यरत होते; आणि दिवंगत बंधू एल. एम. जयमोहन उर्फ जयकुमार, जे कॉर्ले हायस्कूलशी संबंधित होते.



अनेक तरुणांप्रमाणेच, सरकारी नोकरीतील जबाबदाऱ्यांमुळे काही वेळा मला चर्चच्या उपासना सेवांना उपस्थित राहणे शक्य होत नसे. अशा वेळी, देवाचे हे समर्पित सेवक पोलीस अधिकाऱ्यांच्या सतर्कतेप्रमाणे माझा अथकपणे शोध घेत असत. ते मला माझ्या कामाच्या ठिकाणी, कॅन्टीनमध्ये आणि इतर ठिकाणी शोधून काढत असत. प्रेम आणि आपुलकीने ते मला सल्ला देत असत व विश्वासूपणे चर्चला येण्याचे आणि मंडळीच्या प्रत्येक कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे महत्त्व व त्याचे आध्यात्मिक लाभ शिकवत असत.

माझे आध्यात्मिक जीवन दृढ राहावे आणि मी योग्य मार्गापासून भरकटू नये यासाठी त्यांनी स्वतःचा वेळ, पैसा आणि ऊर्जा स्वेच्छेने खर्च केली. मी खात्रीपूर्वक साक्ष देऊ शकतो की, त्यांच्या परिश्रमांचा आणि समर्पणाचा माझ्या आध्यात्मिक जीवनाच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वाचा वाटा होता. काही बाबतींत ते शिस्तप्रिय आणि कठोर होते, परंतु त्याचबरोबर ते संयमी, दयाळू आणि माझ्यासारख्या तरुण विश्वासणाऱ्यांना शिष्यत्वात वाढविण्यासाठी मनापासून समर्पित होते.

नंतर, जेव्हा प्रभूने आपल्या कृपेने ***एको ऑफ हिज कॉल*** या सेवाकार्यावर आशीर्वादांचा वर्षाव केला, तेव्हा या देवाच्या सेवकांनी पितृतुल्य प्रेमाने मदतीचा हात पुढे केला. ते आपल्या प्रभावी संदेशांद्वारे आणि विशेष सभांमधील सेवेद्वारे आमच्या मंडळ्यांची नियमितपणे आत्मिक उन्नती करीत असत. माझा ठाम विश्वास आहे की, त्यांनी केवळ माझ्या जीवनावरच नव्हे, तर हजारो स्त्री-पुरुषांच्या जीवनावरही चिरस्थायी प्रभाव टाकला.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली वाढलेले विश्वासणारे मंडळीच्या शिस्तीचा आदर करणे, तसेच मंडळी आणि पाळकाप्रती उत्तरदायित्वाने वागणे यासाठी प्रशिक्षित झाले होते. त्यांनी वैयक्तिक मान-सन्मान किंवा प्रसिद्धीसाठी नव्हे, तर केवळ देवाच्या गौरवासाठी परिश्रम



केले. प्रभू त्यांच्या स्मृतींना आणि त्यांच्या पुढील पिढ्यांना विपुल आशीर्वाद देवो.

आजच्या मंडळ्यांमध्येही देवाने पुन्हा एकदा असे अत्यंत समर्पित, निःस्वार्थी आणि विश्वासू स्त्री-पुरुष उभे करावेत, ही माझी मनापासून प्रार्थना आहे.

*****************

(पान ६ वरुन...)

- हेच अभि वचन यहोशवाला देण्यात आले होते – "**बलवान हो, धैर्य धर, कारण यहोवा तुझा देव तुझ्यासंगती आहे.**" (यहोशवा १:९).
- यशया ४१:१० मध्ये असेच आश्वासन देण्यात आले आहे – "**तू भिऊ नको, कारण मी तुझ्यापाशी आहे;............ मी आपल्या न्यायीपणाच्या उजव्या हाताने तुला आधार देईन.**"



*मी आपल्या न्यायीपणाच्या उजव्या हाताने तुला आधार देईन.*

जेथे तुलना असते, तेथे निरुत्साह आणि भयही येतात. म्हणून इतरांकडे पाहून स्वतःचे मोजमाप करू नका. आपल्याकडे देवाकडून प्राप्त झालेले एक उच्च आणि स्वर्गीय बोलावणे आहे.

## २. बाह्यपणे सामोरे जावे लागलेली आव्हाने!

अंतर्गत संघर्षांवर मात केल्यानंतर, इस्राएल लोकांना त्यांच्या प्रदेशातील अधिकाऱ्यांकडून बाह्य विरोधाचा सामना करावा लागला:

हे मंदिर बांधण्यास आणि ही तटबंदी पूर्ण करण्यास तुम्हाला कोणी परवानगी दिली?

विरोध होत आहे याचा अर्थ असा नाही की देवाने आपल्याला सोडून दिले आहे. आपल्या वतीने देव खरोखर कार्य करीत आहे की नाही, आणि एखादी गोष्ट त्याच्या इच्छेनुसार आहे की नाही, हे ओळखण्यासाठी आपल्याला आध्यात्मिक विवेकाची गरज आहे. जेव्हा आपण देवाच्या इच्छेप्रमाणे आज्ञाधारकतेने चालत असतो, तेव्हा आपल्या समोर येणाऱ्या प्रत्येक विरोधाचा उपयोग देव त्याच्या राज्याच्या प्रगतीसाठी करू शकतो.

- दाविदाने गल्याथचा सामना केला.
- नहेम्याला सनबल्लाट आणि तोबीया यांच्या विरोधाचा सामना करावा लागला.
- पौलाला यहुदी विरोधकांकडून छळाचा सामना करावा लागला.
- सुरुवातीच्या ख्रिस्ती बांधवांना सर्वत्र विरोधाचा सामना करावा लागला.
- तरीही, या सर्व प्रसंगांमध्ये, देवाच्या नावाला गौरव प्राप्त झाला.

त्याचप्रमाणे, या अध्यायातही विरोध उभा राहताना आपण पाहतो. मंदिराचे भग्नावशेषांतून पुनर्निर्माण करण्यासाठी लोकांनी आपल्या नोकऱ्या, कुटुंबे आणि सुखसोयीचे जीवन मागे सोडले होते. त्यांनी मोठमोठे त्याग केले होते. तरीही, त्यांचे कौतुक होण्याऐवजी त्यांना टीकेला सामोरे जावे लागले. प्रोत्साहनपर शब्दांऐवजी त्यांच्याविरुद्ध तक्रारींची पत्रे पाठवली गेली आणि त्यांच्या कार्यावर सतत प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले.

लोकांकडून सन्मानाची अपेक्षा करू नका; देव स्वतःच आपल्याला प्रतिफळ देणारा आहे. त्याची इच्छा विश्वासूपणे पूर्ण करीत राहा.

प्रिय मित्रांनो, जेव्हा तुम्हाला विरोधाचा सामना करावा लागतो, तेव्हा घाबरू नका. "परंतु यहुद्यांच्या वडिलांवर त्यांच्या देवाचे लक्ष होते" आजही आपल्या प्रभूचे लक्ष तुमच्यावर आहे. हे तुमच्यासाठी देवाचे वचन असू शकते: तुझ्याविरुद्ध चालवलेले कोणतेही शस्त्र यशस्वी होणार नाही; आणि तुझ्यावर उठवलेला प्रत्येक वाद तू अन्यायी ठरवशील.

देवाने काय केले?

जेव्हा तो लढण्यास सुरुवात करील, तेव्हा **तो आकाशांना आणि पृथ्वीला हालवील** (हाग्गय २:२१). तो संपूर्ण विश्वातील सर्व गोष्टी आपल्या हितासाठी कार्यान्वित करील.

जेव्हा सर्व काही त्यांच्या विरोधात आहे असे वाटत होते, तेव्हा आपण एज्रा ६:१२ मध्ये वाचतो: मी दारयावेशानेच आज्ञा केली आहे, ती काळजीपूर्वक अंमलात आणावी.

ज्याच्याकडे त्यांच्याविरुद्ध तक्रारी पोहोचल्या होत्या, त्याच राजाने आता एक आदेश जारी केला आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

- **त्याने अधिकृतपणे पुनर्बांधणीला पुन्हा मान्यता दिली: "देवाच्या या घराचे काम चालू द्या;....."**(एज्रा ६:७).
- **त्याने आदेश दिला की हे काम राजाच्या द्रव्यातून पूर्णपणे निधी देऊन पूर्ण केला जावा**(एज्रा ६:८).
- **त्याने उपासनेसाठी आवश्यक असलेली सर्व साधनसामग्री दररोज पुरवली जाईल याची खात्री केली**(एज्रा ६:९-१०).
- **त्याने कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कठोर शिक्षेचा इशारा दिला**(एज्रा ६:११-१२).

राजा दारयावेश यांचा प्रतिसाद केवळ पाठिंब्यापुरता नव्हता-तो संरक्षणात्मक आणि उदार होता.

जे सुरुवातीला विरोध म्हणून सुरू झाले, ते शेवटी पुनर्बांधणीच्या कार्याला लोकांच्या अपेक्षेपेक्षा खूप अधिक बळकट बनवणारे ठरले.

**जेव्हा परमेश्वर आपला उद्देश जाहीर करतो** (हाग्गय २).

**ते साध्य करण्यासाठी तो मानवी व्यवस्थांची पुनर्रचना करतो** (एज्रा ६).

मी प्रार्थना करतो की या महिन्यात देव तुमच्याविरुद्ध बोलले गेलेले प्रत्येक नकारात्मक शब्द रद्द करील आणि तुमच्या हानीसाठी केलेली प्रत्येक योजना तुमच्या हितासाठी वळवील. जर देव आपल्या लोकांच्या जीवनातील आपला उद्देश पूर्ण करण्यासाठी संपूर्ण व्यवस्था बदलू शकतो, तर तो आज तुमच्या जीवनातही तेच नक्की करू शकतो. त्याचे लक्ष तुमच्यावर आहे.

आपल्याला फक्त त्याच्यावर विश्वास ठेवण्याची गरज आहे. क्रूसावर प्रकट झालेली त्याची प्रीती मोजता न येण्याइतकी महान आहे. आपण विजयशाली जीवन जगावे म्हणून येशू ख्रिस्त मरण पावला.

म्हणून, निर्माणकर्त्यावर विश्वास ठेवा.

****************

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

| | |
|---|---|
| Branch | : **Triplicane, Chennai-5** |
| Name | : **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : **1023 2934 679** |
| IFSC | : **SBIN 00 00 249** |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

| | |
|---|---|
| Branch | : **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : **Echo of His Call** |
| A/C No. | : **6038 0502 2319** |
| IFSC | : **ICIC 000 6038** |

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | |
|---|---|
| Branch | : **Triplicane, Chennai-5** |
| Name | : **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : **1023 2923 805** |
| IFSC | : **SBIN 00 00 249** |

## OUR QR CODE:

ECHO OF HIS CALL

Scan to pay with any UPI app

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS Patrika Channel"**
**on 13th JULY 2026.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**